**चौकशी अर्ज क्रमांक १/२०१८ मधील निशाणी १ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज मयत श्री. एडमोंड रफेल डिसोझा यांच्या पत्नी व मुलांनी मुंबई प्रांतिक अधिनियम १८२७ चे प्रकरण VIII (Chapter I & II) प्रमाणे वारस दाखला मिळणेकामी दाखल केला आहे.

अर्जदार यांच्या अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :—

२. अर्जदार क्र.१ ही मयत श्री. एडमोंड रफेल डिसोझा यांची पत्नी व अर्जदार क्र.२ व ३ ही मुले आहेत. मयत श्री. एडमोंड रफेल डिसोझा हे दिनांक १४/१२/२०१७ रोजी मरण पावले. मयत श्री. एडमोंड रफेल डिसोझा हे विनामृत्युपत्र मरण पावले. अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत श्री. एडमोंड रफेल डिसोझा यांचे कायदेशीर वारस आहे. मयत श्री. एडमोंड रफेल डिसोझा यांच्या नांवे अर्जात नमूद केल्याप्रमाणे अपार्टमेंट नं. व्हीएस३/१९/०—२, तळमजला, व्हीएस३/जेएन ३टाईप, आर्शिवाद अपार्टमेंट मालक संघटना इमारत क्र. १४ ते २३, निवासी क्र.९ क्षेत्र, नवी मुंबई ही मिळकत आहे. अर्जदार क्र.१ ते ३ हे सदरचा अर्ज मयत श्री. एडमोंड रफेल डिसोझा यांचे वारसदार आहे, असा वारस दाखला मिळणेसाठी दाखल केला आहे.

३. कोकण सकाळ या वृत्तपत्रामध्ये दिनांक २०/०१/२०१८ रोजी जाहीर नोटीस प्रसिध्द करुन वारस दाखला देणे संबंधी हक्क, अधिकार व हितसंबंध असलेल्यांकडून हरकती मागविण्यात आल्या. तसेच जाहिरनामा (निशाणी ५) वरुन असे दिसून येते कि, दिनांक २२/०२/२०१८ रोजी दिलेल्या पत्त्यावर जाऊन बेलिफाने जाहिरनामा प्रसिध्द केला आहे. परंतु जाहिर नोटीस व जाहिरनामा यामध्ये दिलेल्या मुदतीत कोणीही हरकतदार हजर झाले नाहीत व अर्जदारांचे वारस दाखला मिळणेबाबतच्या अर्जास हरकत घेतली नाही.

४. अर्जाचे पुष्ट्यार्थ अर्जदार क्र १ यांनी त्यांच्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.७ अन्वये, अर्जदार क्र.२ यांनी नि.८ अन्वये व अर्जदार क्र. ३ यांनी नि. ९ अन्वये दाखल केले आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांनी तोंडी

पुराव्याव्यतिरिक्त जाहीरनामा, मयत श्री. एडमोंड रफेल डिसोझा यांचा मृत्यू दाखला, साठेखत, सिडकोचे पत्र, दि. १८.०८.१९९२ रोजीचा नोंदणीकृत करार, शेअर सर्टिफिकेट व आधारकार्ड इत्यादी कागदपत्रे मुळ प्रतीवरुन तपासण्यात आलेल्या सत्यप्रती हा कागदोपत्री पुरावा सादर केला आहे. अर्जदाराच्या तोंडी व सदर कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार क्र. १ ते ३ हे या मयताचे वारस आहेत. अर्जदार क्र.१ ते ३ यांनी निशाणी १६ अन्वये पुरसीस दाखल करून अर्जदारांनी त्याचा पुरावा संपविला. त्यामुळे अर्जदारांचा अर्ज अबाधित राहिला. म्हणून अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस दाखला मिळण्यास पात्र आहेत.

५. अर्जदार हे भारतीय वारस कायदा १९२५ कलम ३९० आणि ३७९ तसेच मुंबई प्रांतिक अधिनियमाचे कलम १ व २ अन्वये वारस दाखला मिळण्यास पात्र होतात. सदरील अर्जानुसार कोणत्याही व्यक्तीचे कोणत्याही मिळकती संदर्भात हक्क व अधिकार ठरविण्यात येत नाहीत. नि. १५ अन्वये मुल्यांकन अहवालानुसार मिळकतीचे मूल्यांकन रू. १९,८०,०८४/— इतके आहे. त्या रकमेवर न्यायालयीन फी भरणे आवश्यक आहे. करिता, खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत श्री.एडमोंड रफेल डिसोझा यांचे कायदेशीर वारस असल्याचे मान्य(recognised) करण्यात येत आहेत.

३. अर्जदार क्र. १ ते ३ यांनी अर्जात नमुद केल्याप्रमाणे मिळकतीबाबत योग्य न्यायालयीन शुल्क अदा केल्यानंतर अर्जदार क्र. १ ते ३ यांना वारस दाखला देण्यात यावा.

(श्रीमती शु.ज.कातकर)<br>
दिनांक :— ०२/०३/२०१९ — ३ रे सह दिवाणी न्यायाधीश,<br>
क.स्तर, वाशी.

## निशाणी १ वरील आदेश

प्रस्तुत अर्जामध्ये दाखल केलेल्या मुल्यांकन अहवालानुसार नमुद मिळकतीचे मुल्यांकन हे रू. १९,८०,०८४/— इतके आहे. त्यामुळे सदरचे प्रकरण या न्यायालयात चालवता येणार नाही. परंतु अनावधानाने सदर अर्जामध्ये आदेश पारित करून अर्ज मंजूर करण्यात आला होता. त्यानंतर मुल्यांकन लक्षात आल्यानंतर त्यामध्ये दि. ०२.०३.२०१९ रोजी पारित केलेला आदेश दिवाणी प्रकिया संहिता कलम १५१ नुसार रद्द करण्यात येत आहे व सदरचा अर्ज अर्जदाराला योग्य त्या न्यायालयात दाखल करणेसाठी परत करण्यात येत आहे.

(श्रीमती शु.ज.कातकर)
दिनांक :— ०५/०८/२०१९
५ वे सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, वाशी.